*एकात्म मानवतावादाच्या मंत्रानुसार कार्य करणे हीच दीनदयालजींना खरी आदरांजली –सुधीर मुनगंटीवार*
=================================================

पं. दीनदयाल उपाध्याय यांचे अंत्योदयाचे स्वप्न साकार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या नेतृत्वात आम्ही सारे कार्यरत आहोत. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातुन तळागाळातील सामान्य जनतेची सेवा करण्याचा वसा आम्ही घेतला आहे. आमचे प्रेम लाल दिव्याच्या गाडीवर नसुन लाल रक्ताच्या माणसावर आहे. सत्ता ही आमच्यासाठी सेवेचे माध्यम आहे. एकात्म मानवतावादाचा जो मंत्र पं. दीनदयाल उपाध्याय यांनी आम्हाला दिला, त्या मंत्रानुसार कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असे प्रतिपादन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्य मुंबईत भाजपाच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांना आदरांजली वाहीली. यावेळी बोलतांना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, पं. दीनदयाल उपाध्याय एकात्म मानवतावादाचे प्रणेते होते. दीनदयालजींनी संघटनेचे जे रोप लावले होते ते आज वटवृक्षात रुपांतरीत झाले आहे. त्यांच्या विचारानुरुप आम्ही सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि गरिबांचे कल्याण हे ध्येय घेवुन आम्ही भाजपाचे कार्यकर्ते म्हणुन कार्यरत आहोत, असेही त्यावेळी बोलतांना म्हणाले. यावेळी आमदार आशिष शेलार, आमदार राज पुरोहीत, मुंबई भाजपाचे सरचिटणीस अमरजित सिंग मिश्रा, विनायक कामत, माजी आमदार अतुल शाह, भाजयुमो महाराष्ट्र सरचिटणीस अमोल जाधव आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.